# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-२६४७८७९५/ ५३१/ २९६/ २६४७०९१६ (वै.) फॅक्स : ०२२-२६४७३९७९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र. मरातंशिमं/का-५०/२०१९/५४६८

दिनांक : 16 JUL 2019

प्रति,
प्राचार्य,
अेआयसीटीई मान्यताप्राप्त मंडळाशी संलग्नीत
तथा स्वायत्त संस्था.

विषय:- **प्रथम सत्र / प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी Induction Program घेणेबाबत..**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या Approval Process Handbook २०१९-२० मध्ये प्रथम सत्र / प्रथम वर्ष प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना Induction Program घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. तसेच मंडळाच्या बृहत आराखड्यामध्ये (Perspective Plan) सुध्दा याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

ग्रामीण व शहरी भाग तसेच वेगवेगळया माध्यमातून दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेत असतात. अशा विविध विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधून त्यांच्यातील संबंध दृढ करण्याची संधी देणे, विद्यार्थी व अध्यापक यांच्यातील संवाद अधिक परिणामकारक करण्याची संधी देणे, नवीन शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेणे, तसेच तंत्रनिकेतनामध्ये अधिक रुची व आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने Induction Program चे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने मंडळ स्तरावर तज्ज्ञ समिती नेमून प्रथम सत्र / प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता Induction Program मध्ये कोणत्या बाबींचा अंतर्भाव असावा, याबाबत चर्चा करुन त्याची निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर Induction Program मध्ये विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाची माहिती, विविध शाखा, व्यक्तिमत्व विकास, पाठ्यक्रम (syllabus) रोजगाराच्या संधी इ. बाबत खालील मुद्देनिहाय माहिती दयावयाची आहे.

1. Scenario of Technical Education – AICTE, DTE, MSBTE, Type of institution, Resources available with the institution.
2. Various engineering branches available with the institution – interlinking & significance of every branch with each other.
3. Specific attention related to personality development – human values, creativity, gender equity, communication skills, importance of cleanliness, health, hygiene & safety, importance of plantation, meditation & yoga.
4. Significance of outcome based education (OBE) - programme outcomes (POs), course outcomes (COs), programme specific outcomes (PSOs), micro projects, industrial training and concept of assessment & attainment.
5. Effective use of computer facilities & IT resources – use of NPTEL/SWAYAM/MOOCs/Spoken Tutorial, effective use of social media.
6. Career opportunities in related industries after completion of diploma education.
7. Interaction with alumni for sharing of their success stories.

उपरोक्त मुद्दयांवर संस्थास्तरावर सविस्तर माहिती तयार करावी व सदर Induction Program सत्राच्या सुरुवातीस प्रथम आठवडयात घेण्यात यावा. याबाबत प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली सविस्तर वेळापत्रक करुन त्याची अंमलबजावणी यथायोग्यपणे होईल याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीकरिता –
मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहिती व कार्यवाहीकरिता –
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.